


# ह्या शिकवणीमध्ये आम्ही तुम्हाला एक साधी हँड बॅग बनविणे शिकवू.



तुम्हा सर्वांसाठी, ज्यांना मूडप्रमाणे वापरता येण्याजोग्या विविध हँडबॅग्ज जवळ असणे आवडते, आज आम्ही एक साधी हँड बॅग बनविणे शिकविणार आहोत. आणि ज्यांना आवडीच्या प्रिंटेड बॅग्ज जवळ असणे आवडते, त्यांच्यासाठी ही एक सुसंधी आहे. ह्या पाठाच्या शेवटी, जर तुम्ही धंदेवाईक आहात, तर तुम्ही न केवळ स्वत:साठी, परंतु ज्यांच्या डिझाईनबद्दलच्या आवडी-निवडी तुमच्याच सारख्या आहेत, त्यांना विकण्यासाठीसुद्धा बॅग्ज बनवू शकाल! आपल्या पाठासाठी, आपण निवडलेले आहे हे रंगीबेरंगी पेजली प्रिंटेड कापड.



एक व्यवस्थित हँडबॅग बनविण्यासाठी तुम्हाला 18 x 13 आकाराचे प्रिंटेड कापड, प्रत्येकी 26 इंचाच्या दोन बॅग स्ट्रॅप, मॅचिंग धागा, फूटपट्टी, मार्कर, टाचण्या आणि कात्री.

सरल बाजू एकमेकांसमोर येतील, अशा पद्धतीने कपड्याला मध्यभागी दुमडून अशाप्रकारे सुरुवात करा. काठांना एका रेषेत घ्या.



काठांपासून थोडे अंतर सोडून दाखविल्याप्रमाणे दोन्ही उघड्या बाजूंना पिन लावून घट्ट करा. प्रत्येक बाजूस तीन टाचण्या पुरेशा होतील. वरची बाजू उघडी ठेवण्यास विसरू नका.





कापड शिलाई मशीन वर घ्या. स्टीच पॅटर्न सेलेक्टर ए वर घ्या आणि स्टीच लेंथ सेलेक्टर 2 आणि 3 च्या मध्ये ठेवा. शिवणे सुरू करा. रिव्हर्स स्टीच लिव्हरचा वापर करून स्टीचेस लॉक करण्याची खात्री करा. काठांच्या समांतर शिवा आणि शेवटपर्यंत शिवणे सुरू ठेवा. शेवट लॉक करण्यास विसरू नका. धागा कापा. विरुद्ध बाजू शिवण्यासाठी हीच प्रक्रिया पुन्हा करा. दोन्ही बाजू शिवून झाल्यानंतर टाचण्या काढण्यास विसरू नका.



दोन्हीपैकी एका काठाला त्रिकोणाचा आकार द्या – अशाप्रकारे आणि त्यास टाचणी लावून घट्ट करा. दुसर्या बाजूसही हीच प्रक्रिया करा. त्रिकोणाच्या टोकदार बाजूपासून अडीच इंच मोजून खूण करा. मी केल्याप्रमाणे, खुनेवर एक आडवी रेघ ओढा.
दुसर्या बाजूसही हीच प्रक्रिया करा. ओढलेल्या रेघांवरून दोन्ही बाजूंनी शिवून घ्या. रिव्हर्स स्टीच लिव्हरचा वापर करून शेवट लॉक करून घ्या. धागा कापून टाका.







शिवलेल्या रेषेच्या पलीकडील कोपरे दोन्ही बाजूंनी थोडी जागा सोडून कापा. ह्यामुळे त्यास एक व्यवस्थित आकार प्राप्त होतो आणि अतिरिक्त कापड राहत नाही.

पुढे उघड्या बाजूचे काठ सुमारे एक इंचाने दुमडून घ्या. त्यास टाचणी लावून घट्ट करा. बॅग स्ट्रॅप लावण्यासाठी दोन्ही बाजूंनी पाच इंच मोजून खूण करा. दुसर्या बाजूसही असेच करा.

मध्यभागाच्या रेषेत बॅग स्ट्रॅपचे एक टोक खुणेवर ठेवा. टाचणीने घट्ट करा. स्ट्रॅप सरल असल्याची खात्री करा आणि त्याचे दुसरे टोक त्याच बाजूला केलेल्या खुणेवर एकाच रेषेत ठेवा. टाचणीने घट्ट करा. हीच प्रक्रिया दुसर्या बाजूसही दुसर्या स्ट्रॅप सोबत करा.













बॅग मशीनवर घ्या. नागमोडी शिवणीसाठी स्टीच पॅटर्न सेलेक्टरला सी वर घ्या; आणि स्टीच लेंथ 1.5 करा.
दाखविल्याप्रमाणे, एकानंतर एक अशाप्रकारे बॅगेच्या दोन्ही बाजू शिवून घ्या. स्ट्रेट स्टीचसाठी पॅटर्न सेलेक्टर ए वर घ्या; आणि स्टीच लेंथ 2.5 करा.बॅग स्ट्रॅपसह तुम्ही दुमडलेली बाजू शिवून घ्या. शिवत असताना टाचण्या काढण्यास विसरू नका.

स्ट्रॅप मजबूत असल्याची खात्री करण्यासाठी आणि त्यास एक व्यवस्थितपणा देण्यासाठी, जिथून शिवणीची सुरुवात झालेली आहे, तिथून दुमडीवर शिवा.

बॅगेची सरळ बाजू बाहेर काढा आणि तुमची बॅग तयार आहे. मस्तच, नाही का… आणि सोपेसुद्धा!

अजून थोड्या बॅग्ज बनवा – असे कधीच होऊ शकत नाही की तुमच्याकडे खूप जास्त बॅग्ज झाल्या आहेत. मजेशीर #MadebyMe टॅग लावा आणि मिरवा. लवकरच तुमची मित्रमंडळींच्या बॅग बनवण्याच्या विनंत्यांच्या रांगा लागतील आणि ह्या बॅग्ज भेट म्हणूनही देता येतील, आणि हे विसरू नका की त्या प्लॅस्टिक बॅग्जचा वापर टाळण्यास मदतही करतात. चला तर मग, लगेच तुमची ओळख करून देणारी बॅग बनवा.